# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

CB/26/2026

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २०/०५/२०२६ |
|---|---|

**‘‘कोम्बींग ऑपरेशन मध्ये नायजेरीयन नागरीकांकडुन १ कोटी २६ लाख २५ हजार रूपये किंमतीचे कोकेन नवी मुंबई गुन्हे शाखेने केले जप्त’’**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.दिपक साकोरे व पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा), श्री.सचिन गुंजाळ यांनी ‘‘नशा मुक्त भारत २०२८’’ या अभियानाच्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात अंमली पदार्थाच्या तस्करी विरूध्द कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

वाशी येथील जुहुगाव येथे राहत असलेल्या नायजेरीयन इसमांनी ते राहत असलेल्या घरामध्ये अंमली पदार्थ विक्री करणेकरीता साठा करून ठेवला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने गुन्हे शाखेचे वेगवेगळे पोलीस पथके तयार करून ०४ ठिकाणी कोम्बींग ऑपरेशन करण्यात आले. कोम्बींग ऑपरेशन मध्ये घर नंबर ५२२/३, हरियाली निवास, जुहु गाव, सेक्टर-११, वाशी, नवी मुंबई येथे राहत असलेला नायजेरीयन नागरीक १) ऑलिवर ओकेचुक्यु उगवु (OLIVER OKECHUKWU UGWU) याचे ताब्यात **१ कोटी २६ लाख २५ हजार रूपये किंमतीचा २५२.५ ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ** व १२ मोबाईल मिळुन आले आहे. तसेच नमुद आरोपीला कोकेन हा अंमली पदार्थ पुरविणारे इतर नायजेरीयन इसम २) मादुयाबुकी कॉसमॉस इग्वेओमा ( Maduabuchi Cosmos Igweoma ) व ३) ईनोसंट दादा लाविआन्स ( Innocent Dada Lawiance ) दोन्ही रा.कोपरी गाव, वाशी, मुळ रा. नायजेरीया यांना देखील ताब्यात घेण्यात आलेले आहे.

सदर आरोपींविरूध्द वाशी पोलीस स्टेशन गु.रजि.नंबर २२९/२०२६, एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा दाखल असुन गुन्हयाचा अधिक तपास अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी अधिकारी वपोनि श्री.संदिप निगडे हे करीत आहेत. तिन्ही आरोपींना दिनांक १९/०५/२०२६ रोजी १३.००वा. अटक करण्यात आली असुन आरोपींची दिनांक २२/०५/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी सहायक पोलीस आयुक्त, श्री.धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.वपोनि पृथ्वीराज घोरपडे, वपोनि श्री.संदिप निगडे, सपोनि निलेश धुमाळ, सपोनि देवेंद्र ओव्हाळ, सपोनि तुषार माने, सपोनि देशमुख, पोहवा/तायडे, पोहवा/दोरे, पोहवा/पवार, पोना/म्हात्रे, मपोना/पाटील, पोशि/चव्हाण, पोशि/धोंडे, पोशि/खिल्लारे, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★